"नव्याने स्थापन केलेल्या नगरपंचायतींना नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य" योजनेअंतर्गत नगरपंचायतींना निधी वितरीत करण्याबाबत.

पारनेर नगरपंचायत, जि. अहमदनगर
सन २०२१-२०२२ साठी लेखाशिर्ष (२२१७ १४९२)
रू. ५.०० कोटी

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक-ननपं-२०२२/प्र.क्र. ७५(क-९) /नवि-१६
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १९ एप्रिल,२०२२.

वाचा :-

(१) नगर विकास विभाग,शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१२/प्र.क्र.२७/नवि-१६,दिनांक २७ जून,२०१२.

(२) नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१२/प्र.क्र.२७/नवि-१६, दिनांक १५ एप्रिल,२०१३.

(३) नगर विकास विभाग,शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.९७/नवि-१६ दिनांक १२ एप्रिल,२०१६.

(४) शासन निर्णय क्रमांक-संकीर्ण-२०१६/प्र.क्र.१८६ /नवि-१६, दिनांक ३ ऑगस्ट,२०१६.

(५) नगर विकास विभाग,शासन निर्णय क्र. धोरण-२०१७/प्र.क्र.६२/नवि-१६ दिनांक १५ मार्च,२०१७.

प्रस्तावना :-

नव्याने स्थापन केलेल्या नगरपंचायतींना नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्यक अनुदान देण्यात येते.सदर योजनेचे निकष संदर्भाधीन क्रमांक (१) ते (५) येथील शासन निर्णयान्वये विहित करण्यात आलेले आहेत. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने, "नव्याने स्थापन केलेल्या नगरपंचायतींना नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य" या योजनेअंतर्गत राज्यातील नगरपंचायतींना निधी व कामे मंजूर वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

"नव्याने स्थापन केलेल्या नगरपंचायतींना नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य" योजनेअंतर्गत सोबत जोडलेल्या विवरणपत्रामधील कामांकरीता **पारनेर**

**नगरपंचायत, जि. अहमदगनर यास रक्कम रू. ५,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये पाच कोटी मात्र)** इतका निधी मंजूर करण्यास खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये मंजुरी देण्यात येत आहे.

२. सदर प्रकल्प खर्चाचा १००% हिस्सा राज्य शासनाचा राहणार आहे. त्यामुळे सदर प्रकल्पाअंतर्गत निश्चित करण्यात आलेल्या कामांना मंजूर रकमेच्या मर्यादेत सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता संदर्भाधीन क्रमांक (१) ते (५) येथील शासन निर्णयान्वये प्राप्त करून घ्यावी.

३. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांच्या सल्ल्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्त करण्याच्या अटीवर कार्यान्वयन यंत्रणा सार्वजनिक बांधकाम विभाग राहील.

४. तांत्रिक मान्यता दिलेली कमी किंमतीची (रू. १० लक्ष पेक्षा कमी किंमतीचे काम) कामे एकत्रित करून प्रशासकीय मान्यता (Package) प्रदान करण्यात यावी. सदर एकत्रित प्रशासकीय मान्यतेची ई-निविदा करणे अपेक्षित आहे. प्रत्येक काम ई-निविदेने करणे बंधनकारक असून, प्रशासकीय मान्यतेच्या रकमेचे पुनश्च: विलगीकरण (Splitting) करून कार्यादेश देणे ही गंभीर अनियमितता समजण्यात येईल व याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.

५. सदर योजनेअंतर्गत करण्यात येणारी कामे अन्य कोणत्याही योजनेतून अथवा स्व:उत्पन्नातून होत नाहीत याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करून घ्यावी.कोणत्याही परिस्थितीत कामांची दुरूक्ती होणार नाही याची दक्षता जिल्हाधिकारी यांनी घ्यावी.

६. सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांच्या “ई-निविदा” अंती प्रकल्प खर्च निश्चित करण्यात यावा. सदरचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा जास्तीचा असल्यास, अशा जास्तीच्या खर्चासाठी कुठल्याही स्वरूपात अतिरिक्त अनुदान शासनाकडून उपलब्ध करुन दिले जाणार नाही.

७. "ई-निविदा" अंतीचा प्रकल्प खर्च हा तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्प खर्चापेक्षा कमी असल्यास, सदर कमी झालेल्या खर्चाच्या राज्य शासन हिस्स्याची रक्कम शासनास जमा करावी. सदरची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहील. प्रत्येक काम किमान रू.१० लक्ष किंमतीचे राहील याची दक्षता घेण्यात यावी.

८. जिल्हाधिकारी, यांची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे ही सार्वजनिक मालकीच्या ठिकाणीच करावीत, कामाचे स्वरुप सार्वजनिक असावे, तसेच त्यामुळे सर्वसमावेशक नागरिकांच्या प्राथमिक सोयी सुविधांमध्ये भर पडणार आहे याची पुन्हा खातरजमा करणे व कुठल्याही खाजगी स्वरुपाच्या कामांना मान्यता देण्यात आली नसल्याची खातरजमा करणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सबंधित शहराच्या विकास नियंत्रण नियमावली व विकास आराखडयाशी सुसंगत असल्याची खातरजमा करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांना "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करणे बंधनकारक राहील.याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच शासनाने निर्गमित केलेल्या अद्यावत मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. "ई-निविदा" कार्यप्रणालीचा अवलंब करण्यात येत असल्याची खातरजमा करणे.

(ड) सदर प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध करून दिलेला निधी त्याच उद्दिष्टासाठी खर्च करण्यात येत असल्याचे, काम गुणवत्तेनुसार झाले आहे किंवा कसे तसेच मंजूर कामावरच मंजूर निधी खर्च झाला आहे किंवा कसे हे पाहणे.

(इ) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामावर करण्यात येणा-या खर्चामुळे आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही हे पाहणे.

(ई) निधी खर्च करताना तो विहीत कार्यपध्दती अनुसरुन सर्व वित्तीय कायदे व नियमांचे तसेच विहीत प्रक्रियेचे अवलंबन करण्यात यावे. निधी खर्च करण्याबाबत वित्त विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयातील सूचनांचा व वित्तीय अधिकारांच्या मर्यादेत (Financial Power) भंग होणार नाही तसेच, कुठलाही शासन नियम/अधिकाराचा भंग होणार नाही हे पाहणे.

(फ) सदर योजनेअंतर्गत करण्यात येणा-या रस्त्यांच्या कामांना इतर कोणत्याही योजनेमधून प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली नाही अथवा सदरची कामे करण्यात आलेली नाही याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(ग) सध्या सुरू असलेल्या पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे प्रस्तावित रस्त्यांचे उत्खनन होणार नाही अशाप्रकारे कामांचे नियोजन करावे.प्रस्तावित रस्त्यांच्या ठीकाणांवरील पाणीपुरवठा व मलनिस्सारण प्रकल्पाची कामे पूर्ण झाल्यानंतरच सदर रस्त्यांची कामे होतील याची खातरजमा जिल्हाधिकारी यांनी करावी.

(च) कामाच्या चुकीच्या नियोजनामुळे पाणीपुरवठा व मलनिस्सारणाच्या प्रकल्पामुळे नव्याने करण्यात येणा-या रस्त्यांचे उत्खनन होऊन निधीचा अपव्यय होणार नाही यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी जिल्हाधिकारी यांची राहील.

९. कार्यान्वयन यंत्रणेची जबाबदारी खालीलप्रमाणे राहील:-

(अ) सदर प्रकल्पाअंतर्गत दुरूस्तीची तथा परिरक्षणाची कामे हाती घेण्यात येत नाहीत हे पाहणे.

(ब) सदर प्रकल्पाअंतर्गतची कामे सुरू करण्यापुर्वीच्या स्थितीचे व काम झाल्यानंतरच्या कामाचे चित्र (Photograph) काढून ठेवणे व मागणीनुसार सादर करणे.

(क) सदर प्रकल्पाअंतर्गतच्या कामांचे त्रयस्थ पक्षाकडून लेखापरिक्षण करून घेणे कार्यान्वयन यंत्रणेस बंधनकारक राहील.

१०. यापुर्वी या योजनेखाली झालेल्या खर्चाबाबतची उपयोगिता प्रमाणपत्रे व सदर शासन निर्णयान्वये उपलब्ध करून दिलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र विहित प्रपत्रात संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून उपलब्ध करून घेऊन, संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करण्याची जबाबदारी संबधित जिल्हाधिकारी यांची राहील.तसेच, उपयोगिता प्रमाणपत्राची एक प्रत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांचेकडे सादर करावी.

११. दिनांक ३१ मार्च २०२३ अखेर ही निधी खर्च करण्याची मुदत संपल्यानंतर आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, मुंबई यांनी या लेखाशिर्षाखाली सन २०२१-२०२२ करीता वितरीत करण्यात येणा-या सर्व निधीच्या उपयोगिताचे प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे. सदरची उपयोगिताचे प्रमाणपत्र एकत्रितरीत्या संबंधित महालेखापाल कार्यालयाकडे सादर करून खर्चित व अखर्चित निधीचा अहवाल शासनास सादर करावा.

१२. सदर शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात येत असलेल्या कामांना निधी वितरीत करण्याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

१३. संदर्भाधीन क्र. (१) येथील शासन निर्णयान्वये ""नव्याने स्थापन केलेल्या नगरपंचायतींना नागरी सुविधा पुरविण्यासाठी सहाय्य" या योजनेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली असून, सदर शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती बंधनकारक राहतील. सदरच्या अटी व शर्तीची पुर्तता झाल्याची व प्रकल्पास सक्षम प्राधिका-यांची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्याची खातरजमा करण्यात यावी.

१४. राज्य शासनाकडून मंजूर करण्यात आलेला निधी तात्काळ संबधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्था/ कार्यान्वयन यंत्रणा यांना कोणत्याही प्रकारची कपात न करता वितरीत करण्यात यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(विवेक कुंभार)
**अवर सचिव,महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय,वरळी, मुंबई-१८
२. विभागीय आयुक्त, नाशिक
३. जिल्हाधिकारी, **अहमदगनर**
४. मा. मंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव
५. मा.राज्यमंत्री (नगरविकास ) यांचे खाजगी सचिव
६. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
७. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
८. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
९. सह संचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई.
१०. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, **अहमदगनर**
१२. जिल्हा प्रशासन अधिकारी, **अहमदगनर**
१३. मुख्याधिकारी,**पारनेर** नगरपंचायत, जि. **अहमदगनर**
१४. वित्त विभाग, व्यय-३/ कोषा प्रशासन-५/अर्थसं-१६/नियोजन विभाग मंत्रालय, मुंबई.
१५. कार्यासन नवि-४ नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६. निवड नस्ती (नवि-१६), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.

## शासन निर्णय क्रमांक-ननपं-२०२२/प्र.क्र. ७५(क-९) /नवि-१६, दिनांक १९ एप्रिल,२०२२ सोबतचे विवरणपत्र

| अ.क्र. | कामाचे नाव | रक्कम रूपये लक्ष |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र. ३ मधील सुभाष ओटी यांच्या घरापासून ते लांणी शिवरस्ता पर्यंत रस्ता करणे. | ४५.०० |
| २ | प्रभाग क्र १२ मधील नरसिंह मंदिर परिसरात सामाजिक सभागृह बांधणे. | १५.०० |
| ३ | प्रभाग क्र. १२ मधील बखळ गल्ली चौक येथील शनीमंदिरासमोर सामाजिक सभागृह बांधणे. | २५.०० |
| ४ | प्रभाग क्र. १० मधील रेपाळे सर यांचे घर ते बवे सर यांच्या घरापर्यंत रस्ता करणे. | ५.०० |
| ५ | प्रभाग क्र ४ मधील पारनेर बुगेवाडी रोड ते वैद्य वस्ती-विधाते वस्ती टेलिफोन ऑफिस पर्यंत रस्ता करणे. | ४५.०० |
| ६ | प्रभाग क्र ९ मधील डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारक सुशोभीकरण करणे | ४०.०० |
| ७ | प्रभाग क्र. १७ मधील विक्रम ओटी घर ते अजय आंटी यांच्या घरापर्यंत रस्ता करणे. | २०.०० |
| ८ | प्रभाग क्र १७ मधील जिल्हा परिषद शाळा ते दादा औटी यांच्या घरापर्यंत रस्ता करणे. | २५.०० |
| ९ | प्रभाग क्र. ५ मधील भरत ओटी ते विजय औटी यांच्या घरापर्यंत रस्ता करणे. | ५.०० |
| १० | प्रभाग क्र ५ मधील भाऊ आंटी ते बाळासाहेब लहू औटी यांच्या घरा पर्यंत रस्ता करणे. | १५.०० |
| ११ | प्रभाग क्र ५ मधील कान्हूर रोड ते संतोष घोडके यांच्या घरापर्यंत रस्ता करणे. | २५.०० |
| १२ | प्रभाग क्र २ मधील बगेवाडी तलाव ते चत्तर वस्ती रस्ता करणे. | २५.०० |

| | | |
|---|---|---|
| १३ | प्रभाग क्र २ मधील सोंडवस्ती अंगणवाडी ते महाराज बाग रस्ता करणे. | २०.०० |
| १४ | प्रभाग क्र १३ मधील भीमाशंकर मंदिरासमोर सभामंडप बांधणे. | २०.०० |
| १५ | प्रभाग क्र १० मधील माळशिकारे यांचे घर ते दुधाडे सर यांच्या घरापर्यंत रस्ता करणे. | ५.०० |
| १६ | प्रभाग क्र ११ व एस बॅंक ते बोळकोबा चौक रस्ता कॉंक्रटीकरण करणे. | १०.०० |
| १७ | प्रभाग क्र ९० मधील मुळे साहेब ते संभाजी काळे यांच्या घरापर्यंत रस्ता करणे. | ५.०० |
| १८ | प्रभाग क्र १० मधील अंतर्गत भूमिगत गटार लाईन करणे. | १०.०० |
| १९ | प्रभाग क्र ६ मधील अळकुटी रोड ते चंद्रकांत चेडे यांच्या घरापर्यंत रस्ता करणे. | ५.०० |
| २० | प्रभाग क्र ६ मधील अळकुटी रोड ते भिमाजी चेंडे यांच्या घरापर्यंत रस्ता करणे. | ५.०० |
| २१ | प्रभाग क्र १० मधील हॉटेल ऋषिकेश ते न्यू आर्ट्स कॉलेज रस्ता दोन्ही बाजूला रस्ता करणे. | १०.०० |
| २२ | प्रभाग क्र. ११ मधील मज्जित परिसर सुशोभीकरण करणे. | १०.०० |
| २३ | प्रभाग क्र ११ व प्रभाग क्र ८ मधील मधील कान्हूर चौक ते पारनेर गांधी एजन्सी पर्यंत रस्ता करणे | २५.०० |
| २४ | एजन्सी पर्यंत रस्ता करणे. प्रभाग क्र १४ मधील कुर्नाडी वस्ती ते संभाजी औटी यांच्या घरापर्यंत रस्ता करणे. | १०.०० |
| २५ | प्रभाग क्र. १४ मधील बाळू औटी ते दत्ता औटी यांच्या घरापर्यंत रस्ता करणे. | २०.०० |
| २६ | प्रभाग क्र ६ मधील पुजारी वस्ती ते औटी वस्ती रस्ता करणे. | ४०.०० |

| | | |
|---|---|---|
| २७ | प्रभाग क्र ८ मधील मंगेश आंटी यांच्या घरापासून शांताराम कावरे यांच्या घरापर्यंत बंदिस्त भूमिगत गटार व रस्ता कॉंक्रेटीकरण करणे | ५.०० |
| २८ | प्रभाग क्र ६ मधील पुणेवाडी रोड ते विश्वनाथ पुजारी घरापर्यंत रस्ता करणे. | ५.०० |
| २९ | प्रभाग क्र ६ मधील अळकुटी रोड ते वसंत चेडे यांच्या घरापर्यंत रस्ता करणे. | ५.०० |
| | **एकुण रक्कम रूपये (लक्ष)** | **५००.००** |